|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ८ (          ) मातृभाषेतून शिक्षण यासोबतच मनुष्य निर्माण आणि राष्ट्र निर्माण या त्रिसुत्रीचा अवलंब शिक्षणात केला जावा असा आग्रह धरून शिक्षणातून समाजउन्नतीचे स्वप्न स्वामी विवेकानंद यांच्या शिष्या भगिनी निवेदिता यांनी धरला होता असे प्रतिपादन राज्याच्या मराठी भाषा सल्लागार समितीचे सदस्य तथा ज्येष्ठ पत्रकार अरूण करमरकर यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने सोमवार दिनांक ८ जानेवारी रोजी डॉ.जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेअंतर्गत श्री.करमरकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. केशवस्मृती प्रतिष्ठानने दिलेल्या देणगीतून या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस.राणे होते. यावेळी प्रतिष्ठानचे सचिव रत्नाकर पाटील हे मंचावर उपस्थित होते.

भगिनी निवेदिता आणि महिला विश्व या विषयावर बोलताना श्री.करमरकर म्हणाले की, मुळ आर्यिश असलेल्या मार्गारेट नोबल या स्वामी विवेकानंद यांच्या भाषणांनी प्रेरित झाल्या आणि त्यांनी विवेकानंद यांच्या समवेत भारतात काम करण्याचा निर्धार केला. भारतात येण्यापूर्वी त्यांनी इंग्लंड मध्ये अध्यापनाचे काम केले होते. स्वत:ची शाळा देखील सुरू केली होती परंतू त्यांचे मन चिंतकाचे होते. धर्म आणि अध्यात्म याबद्दल त्यांच्या मनात आकर्षण होते. स्वामी विवेकानंद यांनी त्यांना सामाजिक कार्यात धैर्याची गरज असते असे सांगुण वस्तुस्थितीची कल्पना दिली. 1898 मध्ये सुखसंपन्नता सोडून ही तरूणी भारतात आली. विवेकानंद यांनी शारदादेवी यांच्याकडे त्यांना पाठविले. त्यातून भारतीय स्त्रीचे अस्सल रूप त्यांना कळाले. शुभ्र वस्त्र देवून त्यांना दिक्षा देण्यात आली त्यांनतर भगिनी निवेदिता यांनी सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आरंभ केला. बालिका विद्यालय सुरू केले. यामध्ये त्यांनी जीवन दर्शनाचे समग्र शिक्षण सुरू केले. समाजात कोणत्याही प्रकारच्या समस्या राहू नये यासाठी मातृभाषेतून शिक्षण दिले जावे, राष्ट्रीय चारित्र्याची जडण-घडण करण्याची क्षमता शिक्षणात असावी असा त्यांचा आग्रह होता. समाजाच्या उन्नतीचे स्वप्न त्यांनी पाहिले आणि आयुष्यभर तो आग्रह धरला. यंदा निवेदिता यांची 150 वी जयंती आहे त्यानिमित्ताने महिलांनी त्यांच्या पैलूंचा अभ्यास करावा असे ते म्हणाले.

प्रारंभी जनसंपर्क अधिकारी सुनील पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रतिष्ठानविषयी रत्नाकर पाटील यांनी भूमिका मांडली, कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.सत्यजित साळवे यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ.राणे व प्रा.दीपक पवार यांनी संपादीत केलेल्या वाचक एक अमृतानुभव या पुस्तकाचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

---

उमवि/16/ हस्तदेय/ 2018                                        दिनांक : 8 जानेवारी, 2018

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**

बातमी - 2

जळगाव दि. ८ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या मंगळवार पासून अब्जांश तंत्रज्ञान या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्यात ज्ञानमंडळ स्थापनेबाबत झालेल्या सामंजस्य करारानुसार अब्जांश तंत्रज्ञान या विषयावर केंद्रीत ज्ञानमंडळ स्थापन झाले आहे. हे ज्ञानमंडळ विकसीत होण्याच्या दृष्टीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दोन दिवसीय कार्यशाळा विद्यापीठाच्या पर्यावरण प्रशाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्‌घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.दिलीप करंबळेकर राहणार आहेत. दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेत डॉ.बाळ फोंडके, नांदेड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.पंडीत विद्यासागर, स्नेहा खोब्रागडे, डॉ.वसंत वाघ, शिल्पा भारस्कर, डॉ.अनिल लचके हे विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत अशी माहिती समन्वयक डॉ.सतीश पाटील यांनी दिली.

---

उमवि/16/ हस्तदेय/ 2018 दिनांक : 8 जानेवारी, 2018

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी